**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.९६ /पापु-०७**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक : - २२ जानेवारी, २००४**

पहा :- शासन निर्णय ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक-ग्रापापु-१०००/प्र.क्र.१०७(५)/पापु-०७, दिनांक १४ नोव्हेंबर २०००

**शासन परिपत्रक :-** राज्य शासनाकडील योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्याच्या धोरणास अनुसरुन, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडील विंधण विहीर कार्यक्रम, महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या अधिनियम १९६१, च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विंधण विहीरींचा संपूर्ण कार्यक्रम आता जिल्हा परिषदामार्फत राबविण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी जिल्हयातील विविध भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाईची स्थिती लक्षात घेऊन टंचाई अंतर्गत घ्यावयाच्या विविध उपाययोजना मंजूरी देतात व त्यावर पर्यवेक्षण ठेवतात.. त्यानुसार, टंचाई अंतर्गत विंधण विहिरीच्या कार्यक्रमास मंजूरी देण्याचे व त्याचे संनियंत्रण करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत. तर, जिल्हाधिका-यांनी सुचविलेल्या/मंजूर केलेल्या कार्यक्रमानुसार टंचाई अंतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी जिल्हा परिषदांनी करावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत टंचाई अंतर्गत उपाययोजनांसाठी जिल्हाधिका-यांनी सुचविलेला प्राथम्यक्रम/अग्रक्रम जिल्हापरिषदांनी डावलू नये. टंचाई अंतर्गत उपाययोजनांची जिल्हा परिषदांमार्फत करण्यात येणा-या अंमलबजावणीचा अहवाल वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्हाधिका-यांना सादर करावा. आवश्यक वाटल्यास, जिल्हाधिकारी जिल्ह्यातील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्यामार्फत अथवा अन्य मार्गाने टंचाई कार्यक्रमावर संनियत्रण ठेवू शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
४. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
७. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
८. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
९. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
११. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)